**दिनांक ०३.०७.२०२५ रोजी–**

**<u>अभियोग पक्षाचा सा. क्र.१. श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची शपथेवर पुढील उलटतपासणी</u>**

**<u>आरोपी पक्ष क्र.१ करीता विद्वान श्री. बर्जे पी.एस., विधीज्ञ यांचे द्वारा सुरु–</u>**

**२७**. हे म्हणने खरे आहे की, कथीत निशाणी क्र.५६ जो काय मी हजर केलेला आहे तो आदेश आहे. हे म्हणने खरे आहे की, कथीत निशाणी क्र.५६ हा आदेश असल्यामुळे अधिकारपत्र नाही. हे म्हणने खरे आहे की, कथीत निशाणी क्र.५६ आदेश हा माझ्या समक्ष तयार झालेला नाही. हे म्हणने खरे आहे की, कथीत निशाणी क्र.५६ हा आदेश कुठे तयार करण्यात आला व कोणी बनविला हे माझ्या सरतपास अथवा बयानामध्ये नमुद नाही. हे म्हणने खरे आहे की, कथीत निशाणी क्र.५६ हा कागद एकाच मुळ प्रतीत बनला. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५६ हा कागद हा माझ्या सरतपासात अथवा माझा जबाब निशाणी क्र.६६ मध्ये एक पेक्षा जास्त प्रतीमध्ये तयार करण्यात आला असे नमुद नाही. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५६ या कागदांवरील सहीच्या पुढे वर्ष नमुद नाही.

**२८**. निशाणी क्र.५६ हा कागद ज्यावेळेला तयार करण्यात आला त्यावेळेला श्री. संजय सबनीस यांना परदेशात वगैरे कोठेही जायचे नव्हते. त्यावेळेला श्री. संजय सबनीस हे काही आजारपणामुळे अंथरुणालाही खिळून नव्हते. हे म्हणने खरे नाही की, श्री. संजय सबनीस हे त्यावेळेला त्यांच्या दैनदिन कामकाजासाठी कार्यालयात येत होते. श्री. संजय सबनीस हे त्या वेळेला रजेवर होते काय याची मला कल्पना नाही. हे म्हणने खरे आहे की, श्री. संजय सबनीस यांनी निशाणी क्र.५६ हा कागद कार्यालयात येऊन सही केलेला नाही हे म्हणने बरोबर आहे.हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५६ हा कागद श्री. संजय सबनीस यांचेकडे सहीला कोणी पाठविला हे मला सांगता येत नाही. श्री. संजय सबनीस हे कार्यालयात हजर नव्हते, ते रजेवर होते, त्यांच्याकडे निशाणी क्र.५६ हा कागद त्यांच्याकडे सहीला पाठविला हे सर्व मी पोलीसांना जबाब देतांना सांगीतलेले नाही.

<u>प्रश्न</u>– ही महत्वाची बाब मी पोलीसांसमोर का लपवून ठेवली? .

<u>उत्तर</u>–मला जो आदेश मिळाला त्यानुसार मी फिर्याद दिली.

**२९**. औरंगाबाद विभागीय क्रिडा संकुल येथे किती क्रिडा अधिकारी आहेत याबद्दल पोलीसांनी माझ्याकडे काही चौकशी केली नाही. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५६ आदेश व निशाणी क्र.६६ माझा जबाब यामध्ये या विषयी काही नमुद केलेले नाही. श्री. संजय सबनीस हे आजारी नाहीत, परदेशात नाहीत अशा वेळेला फिर्याद त्यांनी द्यायला पाहिजे असे मला वाटले. याबद्दल मी व्यक्तीशः श्री. संजय सबनीस यांना विचारले. हे म्हणने खरे आहे की, श्री. संजय सबनीस यांनी स्वतः तक्रार न देण्याचे कारण निशाणी क्र.५६ आदेश अथवा माझे बयाण निशाणी क्र.६६ मध्ये नमुद नाही. हे म्हणने खरे नाही की, कथीत निशाणी क्र. ५६ आदेश व निशाणी क्र.७० आदेश हे सर्व मी बोगस व बनावट हजर केलेले आहेत. हे म्हणने खरे नाही की, निशाणी क्र.५६ आदेश व निशाणी क्र.७० आदेश या मध्ये श्री. संजय सबनीस हे स्वतः फिर्याद का देत नाहीत हे आमच्या कार्यालयाने जाणीवपुर्वक नमुद केलेले नाही. मी पोलीसांना श्री. संजय सबनीस हे

पोलीसांना स्वतः फिर्याद का देत नाहीत या बद्दल त्यांच्याकडे व्यक्तीशः चौकशी केल्याचे सांगीतले नाही.

**३०**. महाराष्ट्र राज्य क्रिडा धोरण–२००१ या बद्दलचा शासन निर्णय मी पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणने खरे आहे की, महाराष्ट्र राज्य क्रिडा धोरण–२००१ चा शासन निर्णय मी व्यक्तीशहः पाहिला नाही अथवा वाचला नाही. हे म्हणने खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुलाची नियमावली मी स्वतः कधीही पोलीस तपासात दिलेली नाही. हे म्हणने खरे नाही की, ही नियमावली काय आहे यामध्ये काय नियम करण्यात आलेले आहेत हे मला वाचायचा योग आलेला नाही. ही नियमावली किती तारखेला तयार करण्यात आलेली आहे हे मला आठवत नाही. ही नियमावली कोणी तयार केली हे मला माहीत नाही. हे म्हणने खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुल यामध्ये कार्यरत असलेल्या अधिका–यांचा पदक्रम मला सांगता येणार नाही. हे म्हणने खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुल कार्यालयामध्ये कोणाला प्राधिकृत/अधिकृत करायचे असेल तर त्याची एक विशिष्ठ नियमावली/ कार्यपद्धती आहे. हे म्हणने खरे आहे की, अधिकृत अथवा प्राधिकृत ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. मला ही नियमावली/कार्यपद्धती ज्या मध्ये अधिकृत अथवा प्राधिकृत करण्यासाठी काय नियम आहे हे माहीत नाही.

**३१**. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५६ आदेश व निशाणी क्र.७० आदेश पारित करण्यात आला जे काय नियम आहेत ते नियम पाळण्यात आलेले नाहीत. विभागीय क्रिडा संकुलाचे मुळ उपसंचालक श्री. संजय सबनीस हेच आहेत. हे म्हणने खरे आहे की, श्री. संजय सबनीस यांच्याकडे मुळ कार्यभार उपसंचालक, विभागीय क्रिडा संकुलाचा असतांना त्यांच्याकडे अतिरीक्त कार्यभार उपसंचालक विभागीय क्रिडा संकुल, औरंगाबाद याचा दिला होता असेच मला म्हणायचे आहे. हे म्हणने खरे नाही की, एखाद्या व्यक्तीकडे मुळ उपसंचालक पद असतांना त्याचा अतिरीक्त कार्यभार त्याच व्यक्तीकडे देता येत नाही.

<u>न्यायालयाचा</u> <u>प्रश्न</u>– एकाच व्यक्तीकडे असे दोन कार्यभार कसे देण्यात आले?.

<u>उत्तर</u>– श्री. संजय सबनीस यांच्याकडे आमच्या विभागीय क्रिडा व युवक संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे येथील उपसंचालक कार्यभार आहे आणि अतिरीक्त कार्यभार हा विभागीय क्रिडा संकुल औरंगाबाद चा देण्यात आलेला आहे.

(<u>साक्षीदार अतिशय गोंधळलेल्या परिस्थीत प्रश्न समजुन सुध्दा उत्तर देतांना गोंधळून देत आहे व उत्तरही बदलत आहे</u>.)

हे म्हणने खरे आहे की, श्री. संजय सबनीस यांच्याकडे उपसंचालक म्हणून पुणे येथे मुख्य कार्यभार आहे हे मी प्रथमच सांगीतले आहे. हे म्हणने खरे नाही की, औरंगाबाद येथे कार्यालयात काहीही करायचे असल्यास त्या विषयीची परवानगी पुणे येथील कार्यालयातून घ्यावी लागते. हे म्हणने खरे आहे की, औरंगाबाद विभागीय क्रिडा संकुल कार्यालयाला जे काही करायचे आहे ते करण्यासाठी पुणे येथील कार्यालयाने दिलेली आहे. हे मला माहीत नाही की, ही मुभा आमच्या कार्यालयास पुणे कार्यालयाने कोणत्या पत्राने दिली. हे म्हणने खरे आहे की, औरंगाबाद येथील कार्यालयात काही करायचे असल्यास पुणे कार्यालयाची परवानगी घेणे आवश्यक नाही व

औरंगाबाद कार्यालयास काही करण्याची मुभा आहे हे मी मनाने सांगीतले आहे त्याला काही आधार नाही.

३२. श्री. सुधीर मोरे हे त्यावेळेला तत्कालीन संचालक होते. आमच्या कार्यालयात क्रिडा संचालक हे पदच नाही. हे म्हणने खरे आहे की, मी स्वतः उपसंचालक विभागीय क्रिडा संकुल अथवा अतिरीक्त उप संचालक कार्यभार दिलेले यांची कर्तव्य सुची मी वाचुन पाहिलेली नाही. हे म्हणने खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुलास येणा–या निधीची मला वैयक्तीक कुठलीही माहीती नाही.

**मध्यान्हाच्या सुट्टीमुळे उर्वरीत उलटतपास मध्यान्होत्तर कालावधी पर्यंत तहकुब.**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| –/स्वाक्षरीत/– | –/स्वाक्षरीत/– |
| **( श्री. आर. एस. जांबोटकर )** | **( श्री. आर. एस. जांबोटकर )** |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

**दिनांक – ०३/०७/२०२५**

**मध्यान्हाच्या सुट्टीच्या कालावधीनंतर**
**अभियोग पक्षाचा सा. क्र.१. श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची शपथेवर पुढील उलटतपासणी**
**आरोपी पक्ष क्र.१ करीता विद्वान श्री. बर्जे पी.एस., विधीज्ञ यांचे द्वारा सुरू–**

३३. हे म्हणने खरे नाही की, विभागीय क्रिडा संकुल समिती आणि क्रिडा व युवा कल्याण कार्यालय ही दोन वेगळे विभाग आहेत. हे म्हणने खरे नाही की, हे दोन्ही वेगळे विभाग नसतांना ह्या दोनही विभागांना उगाचच वेगळी नावे दिले आहे असे म्हणता येईल. हे म्हणने खरे आहे की, मी वरील दोन्ही प्रश्नांची उत्तरे समजुन दिलेली आहेत. हे म्हणने खरे नाही की, हे दोन्ही विभाग वेगळे नसल्यामुळे त्याचे उच्च अधिकारी हे एकच असतील. हे म्हणने खरे नाही की, या दोन्ही विभाग एकच असल्यामुळे त्याची पदक्रमता एकच आहे. हे म्हणने खरे आहे की, मी हे दोन्ही विभाग आहेत हे माझ्या फिर्याद जबाब व सरतपासात नमुद केलेले आहेत. मला निशाणी क्र.६६ फिर्याद जबाब व माझा सरतपास निशाणी क्र.५५ दाखविला यामध्ये हे नमुद नाही. हे म्हणने खरे नाही की, हे दोन्ही विभाग एकच आहे असे मी जे सांगतो हे मी खोटे सांगत आहे.

३४. विभागीय क्रिडा संकुल समितीचे अध्यक्ष हे पालकमंत्री जिल्हा औरंगाबाद हे असतात. समितीचे उपाध्यक्ष हे विभागीय आयुक्त विभाग औरंगाबाद भारतीय प्रशासकिय सेवा हे असतात. त्यानंतर समितीचे सदस्य सचिव/उपसंचालक हे असतात.

३५. क्रिडा व युवा कल्याण कार्यालयाचे मुख्य हे आयुक्त, क्रिडा व युवक कल्याण–पुणे मुख्य कार्यालय, भारतीय प्रशासकिय सेवा हे असतात. हे म्हणने खरे नाही की, या विभागाची महाराष्ट्रात पाच ते सहा कार्यालये आहेत. हे म्हणने खरे नाही की, आयुक्ता नंतर उपसंचालक हे पद असते. आयुक्ता नंतर सहसंचालक हे आहेत व ते मुख्य कार्यालय पुणे येथे असतात. सहसंचालकांच्या वरती संचालक असतात. आयुक्त आणि संचालक हे एकच आहे. सहसंचालकानंतर उपसंचालक असतात. एकूण ११ उपसंचालक आहेत. हे म्हणने खरे नाही की, हे सर्व उपसंचालक एकाच इमारतीत व एकाच शहरात बसतात. हे म्हणने खरे आहे की, मी

पाच–सहा या विभागाची कार्यालये नाहीत हे उत्तर मी समजुन उमजुन दिले. हे म्हणने खरे नाही की, क्रिडा व युवा कल्याण विभागाचे उपसंचालक हे इतर कोणत्याही महाराष्ट्राच्या शहरात बसत नाही हे मी सांगीतले आहे हे खोटे सांगत आहे.

**३६.** विभागीय क्रिडा संकुल समिती आणि क्रिडा व युवा कल्याण हे आता दोन वेगवेगळे भाग आहेत असे माझे म्हणने आहे. विभागीय क्रिडा संकुल समितीचा शासनाचा कथीत निधी हा विभागीय क्रीडा संकुल समितीच्या कार्यालयामध्येच येतो. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५६ आदेश, निशाणी क्र.७० आदेश निशाणी क्र.६६ माझा फिर्याद जबाब व निशाणी क्र.५५ माझा सरतपास यामध्ये कुठेही माझे असे म्हणने नाही की, मी विभागीय क्रिडा संकुल समितीच्या कार्यालयामध्ये कार्यरत आहे.

**३७.** हे म्हणने खरे नाही की, विभागीय क्रिडा संकुल समितीमध्ये एकूण ५ ते ६ कायमस्वरुपी अधिकारी आहेत. माझ्या म्हणन्यानुसार दोन अधिकारी आहेत. त्या अधिका–यांची नावे १. श्री. संजय सबनीस–उपसंचालक तथा सदस्य सचिव, विभागीय क्रिडा संकुल समिती व २. श्री. स्वप्नील तांगडे वरिष्ठ लिपीक हे आहेत. हे म्हणने खरे आहे की, मला अधिका–यांचा हुद्द विचारलेला नव्हता तो मी स्वतःहुन सांगीतला. मला असे म्हणायचे आहे की, श्री. दिपक जगदाळे, श्री. आनंद थोरात, श्री. ठाकुर, श्री. गोरे आणि श्री. मिसाळ हे विभागीय क्रिडा संकुल समितीमध्ये कायमस्वरुपी कामाला नाहीत. हे पाचही कर्मचारी अथवा अधिकारी उपसंचालक कार्यालय, क्रिडा व युवक सेवा, औरंगाबाद या कार्यालयामध्ये कार्यरत आहेत. माझे ही असेच म्हणने आहे की, हे पाचही अधिकारी ज्या कार्यालयात नियुक्त आहे त्याच ठिकाणी मी नियुक्त आहे. हे म्हणने खरे आहे की, हे पाचही कर्मचारी त्या कार्यालयातील जुने कर्मचारी आहेत. हे म्हणने खरे नाही की, निशाणी क्र.६६ व सरतपास निशाणी क्र.५५ मध्ये मी क्रिडा व युवक सेवा कार्यालयात कायमस्वरुपी कर्मचारी असल्याचे कुठेही म्हटलेले नाही. निशाणी क्र.६६ माझा फिर्याद जबाब व निशाणी क्र.५५ माझा सरतपास मला दाखविला यामध्ये मी या कार्यालयात कायमस्वरुपी म्हटलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, परिविक्षाधिन कालावधी व कायमस्वरुपी हे वेगवेगळे आहेत. मी कायमस्वरुपी कर्मचारी आहे असे माझे म्हणने आहे. परिविक्षाधीन कालावधी हा दोन वर्षाचा असतो. हे म्हणने खरे नाही की, आज पासून मी दोन वर्षापुर्वी नौकरीला लागलेलो असेल. हे म्हणने खरे नाही की, मी कायमस्वरुपी कर्मचारी आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की, मी कायमस्वरुपी कर्मचारी नाही व तसा मी जाणीवपुर्वक कागद हजर केलेला नाही.

**३७.** हे म्हणने खरे आहे की, हजर केलेला शासन निर्णय दिनांक २६.०३.२००३ ही स्कॅन कॉपी आहे. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५८, दिनांक ३१ ऑगस्ट २०२० चा शासन निर्णय ही सुध्दा मी छायाकिंत प्रत हजर केलेली आहे. हे म्हणने खरे आहे की, हे दोन्हीही कागद मी तयार केलेले नाहीत. हे म्हणने खरे आहे की, या दोनही शासन निर्णयावर महाराष्ट्र शासनाचा लोगो नाही. हे म्हणने खरे नाही की, हे दोनही कागद खरे अथवा खोटे अथवा बनावट आहे या बद्दल मी भाष्य करू शकत नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, हे दोनही कागद शासनाच्या वेबसाईटवरून घेतलेले आहेत. मी सरतपासात अथवा फिर्याद जबाबामध्ये हे दोनही कागद शासनाच्या वेबसाईटवरून घेतले हे सांगीतलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, या दोनही

कागदांवर कोणत्या वेबसाईटवरून काढले त्या विषयीचे कोडींग नाही. हे म्हणने खरे नाही की, मी सही सगळीकडे एकच करतो. पोलीसांनी माझ्या सह्यांचे नमुने घेतले नाहीत. मी वेगळ्या वेगळ्या सह्या करतो असे सांगतलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५७ आणि निशाणी क्र.५८ शासन निर्णय हे ज्या ईलेक्ट्रॉनिक माध्यमातुन घेतले त्या विषयीचे त्याच्या सत्यतेचे कलम ६५–बी भारतीय पुरावा कायद्याचे प्रमाणपत्र कोणाकडुनही घेतलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, या शासन निर्णय निशाणी क्र.५७ आणि ५८ यांना ओळखीसाठी म्हणुन निशाणी क्रमांक देण्यात आलेला आहे. हे मी सांगु शकणार नाही की, मी जे काही सरतपासात कागदपत्र बँकाचे अथवा इतर दाखल आहेत त्यालासुध्दा निशाणी हे ओळखींसाठी दिलेले आहेत.

**३८.** हे म्हणने खरे आहे की, मी वर्ग–१ अधिकारी महाराष्ट्र शासन नाही. हे म्हणने खरे आहे की, कागदपत्रांची सत्यप्रत तयार करणे अथवा त्या कागदांवर सत्यप्रत म्हणून सह्या करणे हा अधिकार केवळ वर्ग–१ च्या अधिका–यांना असतो. हे म्हणने खरे आहे की, माझे असे म्हणने नाहीच की, मला महाराष्ट्र शासनाने अथवा आमच्या कार्यालयाने सत्यप्रत करण्याचे अधिकार दिलेले आहेत अथवा मला तसा अधिकार आहेत. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र. ५७ आणि नि.क्र.५८ यावर शिक्का कोणाचा आहे व सही कोणाची आहे हे मी सांगतलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५७ शासन निर्णय यावर संबंधीत अधिकारी श्री. प्रदीप इंदुरकर यांची डिजीटल स्वाक्षरी सुध्द नाही. हे म्हणने खरे नाही की, निशाणी क्र.५७ व नि.क्र.५८ हे शासन निर्णय खोटे व बोगस हजर केलेले आहेत.

**मा. न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उर्वरीत उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब.**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| –/स्वाक्षरीत/– | –/स्वाक्षरीत/– |
| **( श्री. आर. एस. जांबोटकर )** | **( श्री. आर. एस. जांबोटकर )** |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |
| दिनांक – ०३/०७/२०२५ | |